# वसंत देसाई - भाग १



श्रीमती इंदिरा गांधी यांच्या २० सूत्री कार्यक्रमाच्या प्रचाराला मदत करण्यासाठी एका प्रोत्साहनपर गाण्याचे श्री. वसंत देसाई यांनी दि. २२ डिसेंबर १९७५ रोजी रेकॉर्डिंग पूर्ण केले. हे गाणे होते, 'माँ तेरे बीसो सपने साकार करेंगे'. त्यानंतर ते मुंबईतील पेडर रोड वरील कैंब्रिज कोर्ट ह्या आपल्या घरी परतले. ते लिफ्टमध्ये शिरणार तोच दरवाजा बंद होण्यापूर्वीच ती लिफ्ट सुरू झाली. दुर्दैवाने अगदीच चमत्कारिक म्हणावा असा हा अपघात झाला आणि त्यांच्या घरापासून अक्षरश: दोन मिनिटांच्या चालण्याच्या अंतरावर असणाऱ्या जसलोक रुग्णालयात पोहोचेपर्यंत त्यांचे निधन झाले. दिग्गज चित्रपटमहर्षी व्ही. शांताराम यांनी त्यांचे अंतिम विधी आपल्या देखरेखीखाली व्यवस्थितपणे पार पाडले. रुपेरी पडद्याच्या मोहमयी दुनियेत आपल्याला संधी मिळावी म्हणून बरोबर ४६ वर्षांपूर्वी वसंत देसाई यांनी ह्याच शांतारामबापूंची भेट घेतली होती. त्यांनी ह्या उमद्या युवकाला चंदेरी दुनियेत प्रवेश दिला होता. आणि मग हा महान संगीत दिग्दर्शक हे जग सोडून जाताना त्याची पूर्ण जबाबदारी देखील शांतारामबापूंनीच घेतली. 'ह्याला जीवन ऐसे नाव' असे म्हणतात ते खरेच आहे.

गोव्याजवळील सावंतवाडी येथे ७ जुलै १९१२ रोजी वसंत देसाई यांचा जन्म झाला. किशोरवयात त्यांना मराठी रंगमंचावरील लावणी आणि पोवाडा हे लोकप्रिय कार्यक्रम फारच आवडत असत. लावणी म्हणजे सर्वसाधारणपणे तमाशातील स्त्रियांनी लावणीच्या गाण्यांच्या तालावर केलेला एक प्रकारच्या

लोकनृत्याचाच आविष्कार म्हणायला हरकत नाही. यामध्ये एकतारीसारखे तार खेचून वाजवता येणारे ‘तुणतुणे’ आणि ढोलकी या वाद्यांची साथ असते. सवाल-जबाबाची रंगत असलेला तमाशा हा ग्रामीण भागातील एक सुरेख करमणुकीचा प्रकार आहे. उर्दू/पर्शियन मध्ये राजाच्या प्रशंसेसाठी स्तुतिपर ’कसिदा’ नावाचा प्रकार आहे. थोडेफार तसेच शिवाजीमहाराज, महात्मा फुले इ. थोर पुरुषांची महती सांगणारा व त्यासंबंधीची स्फुरणादायी गीते सादर करणारा कार्यक्रम म्हणजेच पोवाडा होय. संगीताची आवड असणाऱ्या वसंत देसाई यांचा अशा प्रकारच्या संगीताकडे ओढा होता.

परंतु आता मूक असला तरी चित्रपटांचा जमाना आला होता. आणि त्यात अभिनय करणाऱ्या नायकांभोवती प्रसिध्दीचे वलय तयार झाले होते. त्यामुळे आता वसंत देसाई यांना चित्रपटातील अभिनेता होण्याचे वेध लागले. ह्या संदर्भात त्यांनी शांतारामबापूंची भेट घेतली. काही वर्षांनंतर त्यांनी सुप्रसिध्द निवेदक अमीन सयानी यांना त्यांच्या त्या भेटीत आपले काय संभाषण झाले ते सांगितले. मूळ हिंदीतून झालेले हे बोलणे वसंत देसाई यांच्या तोंडूनच ऐकूया - "एक दिन मै उनके सामने खडा हो गया । ’हमे ऍक्टर बनना है ।’ बाल बढाकर पहुँचा । लम्बे लम्बे बाल जिनको डायलॉग बोलते वख्त झटकेसे आँखोतक लाया जा सके । मगर मै दुबला पतला और छोटे कद का था । जबकी वो स्टंटका जमाना था । ऊँचे कदके पहेलवान हुआ करते थे । छोटे आदमीका काम नही था । शांतारामजी बोले, ’कैसा काम चाहते हो ?’ मैने गर्दन हिलाकर बाल दिखाये और कहा ’ऍक्टर’. उन्होने सर से पाँव तक मुझे देखा और सोचा, लडका पागल है । फिर उन्हे मुझपे दया आयी । कहे ’रख्खे तो लेता हूँ मगर सब काम करना पडेगा ।’ तो साहब इस तरह मै दुसरे दिनसे ’प्रभात’ मे आ गया ।"

परंतु वसंत देसाई हे गाण्याचे धडेही घेतच होते. अब्दुल करीम खान, गोविंदराव टेंबे यांसारख्या अनेक दिग्गजांकडून ते तालीम घेत होते. ह्याच वेळी त्यांना चित्रपटात कामही मिळाले. त्यांच्या अनेक कामांपैकी पहिले काम त्यांना १९३० सालच्या ’खुनी खंजर’ या चित्रपटात मिळाले. दरम्यान संगीताचा व्यासंगही सुरूच होता.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or

young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com